### थोडक्यात

## पाच टक्के आरक्षणासह संरक्षणासाठी मुस्लिम समाज आग्रही : डंबाळे

**वाल्हे :** महाराष्ट्र सरकारने २०१४ मध्ये मुस्लिम समुदायाला दिलेले (झळाीळ) पाच टक्के आरक्षण पुन्हा देण्यात यावे व यासाठी आवश्यक तो कायदा करावा, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या विविध पक्ष संघटनेच्या प्रतिनिधींच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बैठकात केली आहे, अशी माहिती नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनोरिटीच्या वतीने मुस्लिम आरक्षणांच्या संदर्भामध्ये काम करीत असलेल्या विविध पक्ष, संघटना व संस्थांच्या प्रतिनिधींची पिंपरी येथे शुक्रवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी राहुल डंबाळे, मौलाना नय्यर नूरी, अजीज शेख, हाजी युसुफ कुरेशी, शहाबुद्दीन शेख, हाजी दस्तगीर मणियार, हाजी गुलाम रसूल सय्यद, शहाजी पटेल अत्तार, शाकीर शेख, जैद शेख, युनूस पानडीवाले, नियाज देसाई, सालर शेख, जाफर मुल्ला, इम्रान विजापुरे, असद पटेल, नसीर शेख, जुबेर खान, जुबेर मेमन, ड. फारुख शेख, ड. मोहित पिरंगुठे यांच्यासह शहरातील मुस्लिम समाजाचे विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व प्रतिष्ठीत नागरिक सहभागी झाले होते. या बैठकीत मुस्लिम आरक्षण व संरक्षणासाठी सर्व पातळीवरील पाठपुरावा करण्यासाठी सर्वपक्षीय मुस्लिम आरक्षण व संरक्षण हक्क समितीची स्थापना करण्यात आली आहे. यावेळी व्यापक चर्चा व सर्व शक्यतांची पडताळणी करून मुस्लिम समुदायाला मागील सरकारने दिलेले पाच टक्के आरक्षण पुन्हा मिळण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. केवळ विद्यमान राज्य सरकारने आरक्षणांबाबत कायदा करणे गरजेचे आहे.

# ‘विकसित भारत संकल्प’यात्रेला ग्रामीण भागात १ लाख १४ हजार नागरिकांची भेट




**पुणे / प्रतिनिधी**

केंद्र शासन पुरस्कृत योजना तळागाळातील नागरिकांना पोहचविण्याच्या दृष्टिने सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेला जिल्ह्याच्या ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद मिळत असून २४८ ग्रामपंचायतीत झालेल्या कार्यक्रमात १ लाख १४ हजार नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी नागरिकांना विविध योजनांचा लाभदेखील देण्यात आला.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती चित्रफिती आणि हस्तपत्रकांच्या माध्यमातून देण्यात येत आहे. नागरिकांशी संवाद साधून लाभार्थ्यांची नोंदणीदेखील करून घेण्यात येत आहे. यात्रेच्या माध्यमातून ७९ आयुष्मान कार्ड, ७० भूमी अभिलेख दाखले, ‘हर घर जल’ च्या २८ जोडण्या देण्यात आल्या. याशिवाय ६८ ओडीएफ शौचालय, ७५ मृदा आरोग्य कार्ड, १२० उज्वला गॅस, ४२३ सुरक्षा विमा योजना, २५८ पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना, ७४ आयुष्मान कार्ड इत्यादी योजनेचा लाभ देण्यात आला.

आरोग्य शिबिराअंतर्गत २० हजार १४२ नागरिकांची तपासणी, ५ हजार ३७० क्षय रोग तपासणी, ३ हजार ६६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. १ हजार ८३२ खेळाडू, ६ हजार ६२६ विद्यार्थी, १ हजार ४४८ स्थानिक कलाकार आणि १७ हजार ४३४ महिलांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले.

विविध ठिकाणी शेतकऱ्यांसाठी ड्रोन प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येत आहे. यात्रेद्वारे ११६ शेतकऱ्यांशी नैसर्गिक शेतीविषयी संवाद साधला. ११ लाभार्थ्यांना शौचालय प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी ४५ हजार ६९७ नागरिकांनी विकसित भारतासाठी संकल्प घेतला.

विकसित भारत संकल्प यात्रा २६ जानेवारी २०२४ पर्यंत सुरू राहणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी यात्रेमध्ये सहभागी होऊन केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे जिल्हा परिषद व जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## गोष्टी सांगण्यात पुणेकर अव्वल, चीनचा विक्रम मोडला




**पुणे :** नॅशनल बुक ट्रस्ट मार्फत आयोजित पुस्तक महोत्सवाच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारी १६ ते २४ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव होत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने पुणे महापालिकेने एस. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर गुरुवारी सकाळी आयोजित केलेल्या पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी सांगायच्या या उपक्रमात ३ हजार ६६ पालकांनी सहभागी होत, त्यांनी आपल्या पाल्यांना सलग चार मिनिटे गोष्ट सांगितली. ही गोष्ट पूर्ण होताच पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्ट सांगण्याचा चीनचा रेकॉर्ड मोडत नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला.

या उपक्रमात पुणे महापालिकेच्या शाळा मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत. त्याचबरोबर डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसह अनेक शिक्षण संस्थांच्या शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. यावेळी सुमारे ३ हजारांहून आधिक पालकांनी आपल्या पाल्यांना विविध गोष्टी, कथा वाचून दाखवल्या आहे यापूर्वीचा, पालकांनी आपल्या पाल्यांना गोष्टी किंवा कथा सांगण्याचा विश्वविक्रम चीनच्या नावे असून, तो तोडण्यात पुणे यशस्वी ठरलं आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उद्योजक जय काकडे, ड. एस. के. जैन, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, न्यासाचे संचालक युवराज मलिक, अभिनेत्री प्राजक्ता माळी, संयोजक राजेश पांडे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, भाग्यश्री मंठाळकर आदी उपस्थित होते.

## हॉटेल व्यवसायाच्या बहाण्याने व्यावसायिकाची फसवणूक



**हिंजवडी / प्रतिनिधी**

**हॉटेल व्यवसायाच्या बहाण्याने एका व्यावसायिकाची दोन कोटी ३६ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली.**

हॉटेल व्यवसायाच्या बहाण्याने एका व्यावसायिकाची दोन कोटी ३६ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार १८ जुलै २०१७ ते १४ डिसेंबर २०२३ या कालावधीत हिंजवडी रोड वाकड यथे घडला.

रजित दिनेश चंद्रा (रा. मारुंजी, पुणे) आणि त्याचे इतर साथीदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी निखील सुरेश पवार (वय ३५, रा. ठाणे) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रजित याने भागीदारीत हॉटेल सुरु करण्याबाबत फिर्यादीचा विश्वास संपादन केला. हॉटेल व्यवसायासाठी फिर्यादीस दोन कोटी ३६ लाख रुपये गुंतवण्यास भाग पाडले. त्यानंतर फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. त्यानंतर फिर्यादी यांची हॉटेल व्यवसायात ३० टक्के भागीदारी असताना देखील त्यांना त्यातून बेदखल केले. हॉटेलमध्ये येण्यास प्रतिबंध केला. तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे आरोपीने त्याच्या नातेवाईक महिलांना संचालक म्हणून नेमले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## नारायणगावात आठ बांगलादेशी नागरिकांना ATS ने घेतले ताब्यात



**नारायणगाव / प्रतिनिधी**

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने म्हणजेच ATS ने पुणे जिल्ह्यात मोठी कारवाई केली आहे. ATS नारायणगाव परिसरात कारवाई करत बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी नागरिकांना पकडले आहे.

पकडलेल्या बांगलादेशी नागरिकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता त्यांची एटीएसकडून चौकशी करण्यात येत आहे. बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांद्वारे भारतात घुसखोरी केल्याचे प्राथमिक चौकशीतून समोर आले आहे. बांगलादेशी नागरिक नारायणगाव परिसरात मजुरी करत असल्याची माहिती तपासात मिळाली आहे.

नारायणगाव परिसरात बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. त्यानंतर एटीएसच्या पथकाने गुरुवारी आठ बांगलादेशी नागरिकांना नारायणगाव परिसरातून ताब्यात घेतले.

आठवड्यापूर्वी राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) आणि एटीएसने पुणे, ठाणे परिसरात कारवाई करुन आयसिसच्या दहशतवादी विचारधारेचा प्रसार करणाऱ्या १५ जणांना ताब्यात घेतले होते. याप्रकरणात कोंढव्यातील दोघांची चौकशी करण्यात आली होती.

पुण्यात बुधवार पेठेत काही बांगलादेशी महिला बेकायदा राहत असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली होती. तीन महिन्यांपूर्वी पुणे पोलिसांना बुधवार पेठेतील देहविक्री करणाऱ्या वस्तीत कारवाई करुन बांगलादेशी महिलांसह साथीदारांना ताब्यात घेतले होते. बेकायदा वास्तव्य केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले होते.

## पिंपरी चिंचवड महापालिका उभारणार बर्न वॉर्ड!



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेने जळीतग्रस्तांवर तातडीने उपचार व पुनर्वसन करण्यासाठी एक सुसज्ज जळीत कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आज झालेल्या बैठकीत प्रस्तावित जळीत कक्षाची संभाव्य जागा, दर्जा आणि क्षमता यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार आदी उपस्थित होते.

प्रस्तावित जळीत कक्षात आगीमुळे दुर्घटनाग्रस्त झालेल्या रुग्णांवर उपचार आणि त्यांचे पुनर्वसन करण्यावर भर दिला जाणार आहे. यासाठी महापालिका रुग्णालयांच्या संरचनेमध्ये फेरबदल, नूतनीकरण किंवा सुधारणा करण्यात येणार आहे. यामध्ये आवश्यक मनुष्यबळ आणि अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्यासाठीही गुंतवणूक करण्यात येणार असून रुग्णांना पाठपुरावा आणि पुनर्वसन सेवा देखील पुरविली जाणार आहे.

महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या जळीत कक्षाच्या प्राथमिक खाटांची क्षमता १५ ते ३० असण्याची शक्यता आहे. खाटांच्या क्षमतेबाबत पुढील आढावा बैठकीत सविस्तर निर्णय घेण्यात येणार असून जळीत कक्षासाठी निवडलेल्या स्थळांची पाहणी आयुक्तांकडून करण्यात येणार आहे. महापालिकेने आगीमुळे होणाऱ्या दुखापतींच्या समस्येकडे लक्ष देण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले असून जळीत कक्षाद्वारे पीडितांना उपचार, विशेष काळजी आणि त्यांना शारीरिक आणि मानसिक आघातातून सावरण्यासाठी मार्गदर्शन देण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय विभागाने दिली आहे.

**ग्रामपंचायत शिक्रापूर, ता.शिरूर, जि.पुणे.**

**बी.-१ खुली निविदा मागणी सूचना क्र.१० सन २०२३-२४.**

ग्रामपंचायत शिक्रापूर ता.शिरूर, जि.पुणे येथील खालील कामाची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार तसेच खालील कामाशी संबधित ठेकेदार/कंत्राटदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामांची मोहोरबंद निविदा २ पाकिटे पद्धतीने मागविणेत येत आहे. को-या निविदांचा नमुना ग्रा.पं.कार्यालय शिक्रापूर, ता.शिरूर यांच्याकडुन दि.१६/१२/२०२३ ते दि.२३/१२/२०२३ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०:०० ते सायं ०५:०० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.१६/१२/२०२३ ते दि.२३/१२/२०२३ रोजी सायं ०४:०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कार्यालय शिक्रापूर येथे स्विकारल्या जातील वशक्य झाल्यास त्याच दिवशी दि.२३/१२/२०२३ रोजी सायं ०४:३० वाजेनंतर कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय र.रू. | को-या निविदेची किंमत र.रू | इसारा र.रू. | काम पुर्ण करावयाचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे शिक्रापूर कोयाळी पुनर्वसन समाज मंदिर येथील शौचालय बांधकाम करणे. | ३,१०,८८०/- | ५००/- | ३१०८/- | ३ महिने |
| २. | मौजे शिक्रापूर (उमापवस्ती) काळूबाई मंदिर परिसरात ब्लॉक बसवणे, ओटा बांधणे इ. काम करणे. | ४,७२,८६८/- | ५००/- | ४७२८/- | ३ महिने |
| ३. | मौजे शिक्रापूर येथील गावठाण समाज मंदिर रंगकाम व सुशोभीकरण करणे. | २,८४,९५७/- | २००/- | २८४९/- | ३ महिने |
| ४. | मौजे शिक्रापूर येथील जातेगाव रोड ते तिरुअनंपुरम बिल्डिंग पर्यंत भूमिगत गटर लाईन करणे. | ३,६६,५५०/- | ५००/- | ३६६५/- | ३ महिने |

**टिप:- १.**कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे.**२.** सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपूर्ण तपशील निविदा संच्यामध्ये नमूद केलेला आहे.**३.**बयाना रक्कम कोणत्याही बँके वरील डी.डी./चेकद्वारे ग्रामपंचायत शिक्रापूर या नावाने किंवा ग्रा.पं.नं.नं.७ ची पावती जोडुन काढून तो लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक लिफाफा क्र.०२ उघडला जाणार. **४.**सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-१. नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३.आयकर प्रत ४.पॅनकार्ड.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रामपंचायत शिक्रापूर, ता.शिरूर जि.पुणे.**

**सही/-**
**सरपंच,**
**ग्रामपंचायत शिक्रापूर, ता.शिरूर जि.पुणे.**

**एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड**
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
**नोंदणीकृत कार्यालय:** नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी ‘‘**सार्वजनिक ई–लिलावाद्वारे**’’ ‘‘**जिथे आहे जसे आहे तत्वावर**’’ आणि ‘‘**ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर**’’ खालील मालमत्तेचा ई–लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह–कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 13.12.2023 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. परमजीतसिंग सुजानसिंग अरोरा<br>2. सरनजीतकौर परमजीतसिंग अरोरा<br>3. अरोरा उपक्रम (त्याच्या माध्यमातून मालक परमजीतसिंग सुजानसिंग अरोरा) | मालमत्तेचा पत्ता – फ्लॅट बेअरिंग क्रमांक 408, विंग ‘बी मध्ये **निर्माण सेरेन** नावाच्या इमारतीमध्ये, चौथ्या मजल्यावर, कार्पेट एरिया 810 चौरस फूट संबंधित सील करण्यायोग्य क्षेत्र 1181 चौ.फूट + टेरेस 65, चौ.फूट, + पार्किंग क्रमांक 23, **निर्माण सेरेन** नावाच्या इमारतीत सर्वेक्षण क्र. 24 हिसा नं. 1/1 (जुना सर्व्हे नं. 23) गाव–उंद्री, तालुका:हवेली, जिल्हा: पुणे. आणि सीमा खालीलप्रमाणे:<br>सीमा: पूर्व – हरिश्चंद्र पुणेकर आणि इतरांच्या मालमत्तेद्वारे; पश्चिम – न्याती बिल्डरचे; उत्तर – सचिन दिलीप पुणेकर आणि रावत बिल्डर यांच्या मालमत्तेनुसार; दक्षिण – 15 मीटर रोडने | PUNHL17001696 & PUNHL19000085 | 13 ऑक्टोबर 2023 | रु. 5,14,670/– | रु. 1,13,82,130.65/– | रु. 51,46,700/– | 15-01-2024 | 19-01-2024 सकाळी 11 वाजता |
| | मालमत्तेचा पत्ता – विंग ‘ए’मध्ये फ्लॅट बेअरिंग क्रमांक 702 **निर्माण सेरेन** या इमारतीतील 7 व्या मजल्यावर, चटईक्षेत्राचे मोजमाप 810 चौ.फुट संबंधित सील करण्यायोग्य क्षेत्र 1181 चौ.फुट + टेरेस 65 चौ.फुट, + पार्किंग क्रमांक 71, **निर्माण सेरेन** नावाच्या इमारतीत सर्व्हे क्रमांक,24 हिसा क्रमांक 1/1 (जुना सर्व्हे क्र.23) गाव–उंद्री, तालुका:हवेली, जिल्हा: पुणे येथे वर बांधण्यात आलेले आणि सीमा खालीलप्रमाणे:<br>सीमा: पूर्व – हरिश्चंद्र पुणेकर आणि इतरांच्या मालमत्तेद्वारे; पश्चिम – न्याती बिल्डरचे; उत्तर – सचिन दिलीप पुणेकर आणि रावत बिल्डर यांच्या मालमत्तेनुसार; दक्षिण – 15 मीटर रोडने | PUNHL17001696 & PUNHL19000085 | 13 ऑक्टोबर 2023 | रु. 4,19,603.60/– | रु. 1,13,82,130.65/– | रु. 41,96,036 | 15-01-2024 | 19-01-2024 सकाळी 11 वाजता |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता ‘‘**जशी आहे जिथे आहे तत्वावर**’’ आणि ‘‘**जशी आहे ज्या स्थितीत आहे**’’ त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **18/01/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **19/01/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **20/01/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात, म्हणजे, **नाव –शेखर काळे, संपर्क क्र. 9823271111, ऑफिस एल&टी फायनान्स लिमिटेड – ऑफिस क्र. 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे –411005. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड – ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, CST रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** ई–लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी स्वीकार/नाकार/बदल/रद्द करू शकतात. कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर किंवा ई–लिलाव पुढे ढकलू शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 16.12.2023
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ❋ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com